|| श्री गणेशाय नमः ||

हरिःॐ

Astro • Puja • Vastu


# हरी ॐ धार्मिक पूजा विधी केंद्र

## ज्योतिष आणि वास्तु सल्लागार


योगेशशास्त्री ढवळे (गुरुजी)
Mob. 95944 28749

निलेशशास्त्री ढवळे (गुरुजी)
Mob. 86524 02078

# पाळणे संग्रह व स्त्री गीते



धार्मिक प्रकाशन संस्था, मुंबई

# पाळणे आणि स्त्री गीते

For Hariom Astrologers

Proprietor

किंमत १५ रुपये

धार्मिक प्रकाशन संस्था

१७३ एफ, गिरगाव रोड, मुंबई - ४०० ००४

दूरध्वनी : (०२२) २३८६६१५१

पाळणे आणि स्त्री गीते
नवीन आवृत्ती

सर्व हक्क प्रकाशकाधीन

प्रकाशक :
धार्मिक प्रकाशन संस्था
१७३ एफ, जगन्नाथ शंकरशेठ मार्ग,
गायवाडीसमोर, गिरगाव, मुंबई - ४०० ००४
दूरध्वनी : २३८६६१५१

अक्षरजुळणी
अक्षय फोटोटाइपसेटर्स
डॉ. आंबेडकर मार्ग, ठाणे

मुद्रक :
रा. शं. जोरी
इंदिरा प्रिंटिंग प्रेस
१००५ सदाशिव पेठ,
पुणे - ४११ ०३०
दूरध्वनी : ०२०-२४४७७३२९

# पाळणे

## १. गणपतीचा पाळणा

जो जो जो जो रे गजवदना। मयुरेश्वर सुखवदना॥
निद्रा करिं बाळा एकरदना। सकळादी गुणसगुणा॥ध्रु०॥
गंडस्थळ शुंडा ते सरळी। सिंदुर चर्चुनि भाळीं॥
कानीं कुंडले ध्वजमाळीं। कौस्तुभतेज झळाळी॥जो०॥
पालख लावियला कैलासीं। दाक्षायणिचे कुशीं॥
पुत्र जन्मला हृषीकेशी। गौरिहरांचे वंशी॥जो०॥
चौदा विद्यांचा सागर। वरदाता सुखसार॥
दुरितें निरसिलीं अपार। विष्णूचा अवतार॥जो०॥
लंबोदर म्हणतां दे स्फूर्ति। अद्‌भुत ज्याची कीर्ती॥
जीवनसुत अर्ची गुणमूर्ती। सकळिक वांछा पुरती॥जो०॥

## २. गणपतीचा पाळणा

जो जो जो जो रे गजवदना॥ पतितपावना॥
निद्रा करिं बाळा गजवदना॥ मृत्युंजयनंदना॥ध्रु०॥
पाळणा बांधियला जडिताचा॥ पालख या सोन्याचा॥
चांदवा लाविला मोत्यांचा॥ बाळ निजवी साचा॥जो०॥१॥
दोर धरूनियां पार्वती॥ सखियांसह गीत गाती॥
नानापरि गुण वर्णीती॥ सुस्वर आळवीती॥जो०॥२॥
निद्रा लागली सुमुखाला॥ सिंदूर दैत्याला॥
त्यातें चरणानें ताडिला॥ दैत्य तो मारिला॥जो०॥३॥

बालक तान्हे हें बहुकारी॥ दैत्य वधिले भारी॥
करिती आश्चर्य नरनारी॥ पार्वती लोण उतरी॥जो०॥४॥
ऐसा पाळणा गायिला॥ नानापरि अळविला॥
चिंतामणि दास विनविला॥ गणनाथ निजविला॥जो०॥५॥

## ३. रामाचा पाळणा

बाळा जो जो रे कुळभूषणा। दशरथनंदना॥
निद्रा करिं बाळा मनमोहना। रामा लक्ष्मणा॥ध्रु०॥
पाळणा लांबविला अयोध्येसी। दशरथाचे वंशी॥
पुत्र जन्मला हृषीकेशी। कौसल्येचे कुशीं॥१॥
रत्नजडित पालख। झळके अमोलिक॥
वरती पहुडले कुळदीपक। त्रिभुवननायक॥२॥
हालवी कौसल्या सुंदरी। धरूनी ज्ञानदोरी॥
पुष्पें वर्षिलीं सुरवरीं। गर्जती जयजयकारीं॥३॥
विश्वव्यापका रघुराया। निद्रा करिं बा सखया॥
तुजवर कुरवंडी करूनियां। सांडिन अपुली काया॥४॥
येउनि वसिष्ठ सत्वर। सांगे जन्मांतर॥
राम परब्रह्म साचार। सातवा अवतार॥५॥
याग रक्षुनियां अवधारा। मारूनि रजनीचरां॥
जाईल सीतेच्या स्वयंवरा। उद्धरि गौतमदारा॥६॥
पर्णिल जानकी सुरूपा। भंजुनियां शिवचापा॥
रावण लज्जित महाकोपा। नव्हे पण हा सोपा॥७॥



सिंधूजलडोहीं अवलीळा। नामें तरतिल शिला॥
त्यांवरी उतरूनियां दयाळा। नेईल वानरमेळा॥८॥
समूळ मर्दुनि रावण। स्थापिल बिभीषण॥
देव सोडविल संपूर्ण। आनंदेल त्रिभुवन॥९॥
राम भावाचा भुकेला। भक्ताधीन झाला॥
दास विठ्ठलें ऐकिला। पाळणा गाईला॥१०॥

## ४. रामाचा पाळणा

जो जो जो जो रे रघुराया। निद्रा करिं बा सखया॥
जोगी आलासे भेटाया। शशिसम देखुनि काया॥ बाळा जो०॥
जोगी दिसतो सुंदर। मस्तकीं जटाभार॥
गळां रुंडमाळांचे हार। शोभे व्याघ्रांबर॥ बाळा जो०॥१॥
भस्म चर्चूनी सर्वांगी। वेष्टिला भुजंगीं॥
भूतें घेऊनियां स्वअंगीं। आला प्रेमरंगीं॥ बाळा जो०॥२॥
जटेमधुनियां तो जळ वाहे। मुद्रा लावुनि पाहे॥
मान धरूनियां तो राहे। न कळे कोण आहे॥ बाळा जो०॥३॥
इतुकें ऐकुनियां वचन। हांसले रघुनंदन॥
भावें पदकमळीं तल्लीन। गोसावीनंदन॥ बाळा जो०॥४॥

## ५. श्रीकृष्णाचा पाळणा

बाळा जो जो रे कुळभूषणा। श्रीनंदनंदना॥
निद्रा करिं बाळा मनमोहना। परमानंदा कृष्णा॥ बाळा ध्रु०॥
जन्मुनि मथुरेंत यदुकुळीं। आलासी वनमाळी॥
पाळणा लांबविला गोकुळीं। धन्य केले गौळी॥ बाळा जो०॥

बंदीशाळेंत अवतरूनी। द्वारें मोकलुनी॥
जनकशृंखला तोडोनी। यमुना दुभंगोनी॥ बाळा जो०॥
मार्गी नेतांना श्रीकृष्णा। मेघनिवारणा॥
शेष धांवला तत्क्षणा। उंचावूनी फणा॥ बाळा जो०॥
रत्नजडित पालख। झळके अमोलिक॥
वरती पहुडले कुलतिलक। वैकुंठनायक॥ बाळा जो०॥
हालवी यशोदा सुंदरी। धरूनी ज्ञानदोरी॥
पुष्पें वर्षिलीं सुरवरीं। गर्जति जयजयकारीं॥ बाळा जो०॥
विश्वव्यापका यदुराया। निद्रा करिं बा सखया॥
तुजवरि कुरवंडी करूनियां। सांडिन मी निज काया॥ बाळा जो०॥
गर्ग येऊनि सत्वर। सांगे जन्मांतर॥
कृष्ण परब्रह्म साचार। आठवा अवतार॥ बाळा जो०॥
विश्वव्यापी हा बाळक। दुष्ट-दैत्यांतक॥
प्रेमळ भक्तांचा पालक। श्रीलक्ष्मीनायक॥ बाळा जो०॥
विष पाजाया पूतना। येतां घेईल प्राणा॥
शकटासुरासी उताणा। पाडिल लाथें जाणा॥ बाळा जो०॥
उखळाला बांधिता मातेनें। रांगता श्रीकृष्ण॥
यमलार्जुनांचें उद्धरण। दावानलप्राशन॥ बाळा जो०॥
गोधन राखितां अवलीळा। काळीया मर्दीला॥
दावानळ वन्ही प्राशीला। दैत्यध्वंस केला॥ बाळा जो०॥
इंद्र कोपतां धांवून। उपटी गोवर्धन॥
गाई गोपाळां रक्षून। केलें वनभोजन॥ बाळा जो०॥
कालिंदीतीरीं जगदीश। व्रजवनितांशीं रास॥
खेळुनि मारील कंसास। मुष्टिक चाणूरास॥ बाळा जो०॥



ऐशीं चरित्रें अपार। दावुनि भूमीवर॥
पांडव रक्षील सत्वर। ब्रह्मानंदीं स्थिर॥ बाळा जो०॥

## ६. श्रीकृष्णाचा नवीन पाळणा

मथुरेमध्ये अवतार धरिला॥ कृष्ण देवकीच्या गर्भासी आला॥
तोडून बेड्या बंद सोडिला॥
चरणांच्या प्रतापें मार्ग दाविला॥ जो बाळा जो०॥
गोकुळामध्यें श्रीकृष्ण आला॥ नंदाच्या घरीं आनंद झाला॥
गुढ्या तोरणें शिखरीं बांधिती॥ कुसुमांचे हार देव वर्षती॥जो०॥
तिसऱ्या दिवशीं वाजे वाजंत्री॥ तासे नौबती उत्सव करिती॥
सर्वांच्या मुखीं कृष्ण हा शब्द॥
त्याचे छंदाने नाचे गोविंद॥जो०॥
चवथ्या दिवशीं चवथी चौकी। बाळबाळंतिणींची न्हाणी होती॥
निंबे डाळिंबे नारळ आणिती॥
सख्या मिळोनी दृष्ट काढिती॥जो०॥
पांचव्या दिवशीं पाटापूजन॥ बांधिला फुलवरा वांक्या तोरण॥
सरी बिंदली आंगडें पैरण॥
खिरी भरल्या ताटे ठेविलीं वाढून॥जो०॥
सहाव्या दिवशीं सटवीपूजन॥ हळदीकुंकवाचीं देताती वाणं॥
एकमेकींसी सखया होऊन॥ पानसुपाऱ्या खोबरें वांटिलें॥जो०॥
सातव्या दिवशीं सटवीचा फेरा॥ गोपां बाळंतीण आवरून धरा॥
सांजच्या प्रहरी अंगारा करा॥ गाई-वासरां मुलांलेंकरा॥जो०॥
आठव्या दिवशीं आठवी चौकी॥ गोपां बाळंतीण नवतीस न्हाती॥
सखया मिळोनि जाग्रण करिती॥जो०॥

नवव्या दिवशीं नवस केला ।। खेळणें पाळणें वाहीन तुजला ।।
कृष्ण पालख लागूं दे मजला ।।जो० ।।
दहाव्या दिवशीं दहावी चौकी ।। न्हाणी बोळवून सारवल्या भिंती ।।
मूठभरल्या ओट्या दिधल्या लावूनी ।।जो० ।।
अकराव्या दिवशीं अकरावी चौकी ।। येश्वदा बैसली मंचकावरती ।।
नयनाच्या कोरीं काजळ भरी ।।
वाळ्यांचा नाद उमटे मंदिरीं ।।जो० ।।
बाराव्या दिवशीं बारसें येती ।। परोपरी पक्वान्नें समयें करिती ।।
लाडू मोदक पंखा वारिती ।।
खीर भरल्या वाट्या साखर मिळविती ।।जो० ।।
तेराव्या दिवशीं तेरावी चौकी ।। बारिक जुनें नेसुन येती ।।
मोर गर्जती चौखंडा वरती ।।जो० ।।
चवदाव्या दिवशीं चवदावी चौकी ।। नंदी महादेव परतुनी येती ।।
गोपांचें मीठ बळीराम घेती ।।जो० ।।
पंधराव्या दिवशीं पंधरावी चौकी ।। नगरींच्या नारी मिळून येती ।।
एक म्हणती गोविंद घ्या ।। एक म्हणती माधव घ्यावा ।।
पालखीमध्यें देव मुरारी ।। नांव ठेविलें श्रीकृष्ण हरि ।।जो० ।।
सोळाव्या दिवशीं सोहळा केला ।।
गोपी गवळणीनें कृष्ण आळवीला ।।
एका जनार्दनी पाळणा गाईला ।। जो बाळा जो ।। जो जो रे ।।

## ७. श्रीपांडुरंगाचा पाळणा

पहिल्या दिवशी आनंद झाला। टाळ-विण्याचा गजर केला ।।
चंदन बुक्क्याचा सुवास त्याला।
पंढरपुरात रहिवास केला ।।जो० ।।१ ।।



दुसऱ्या दिवशी करूनी आरती। दिंड्या पताका वैष्णव नाचती।
वरती बसविला लक्ष्मीचा पती ।।जो० ।।२ ।।
तिसऱ्या दिवशी दत्ताची छाया। नव्हती खुलली बाळाची छाया।
आरती ओवाळू जय प्रभुराया ।।जो० ।।३ ।।
चवथ्या दिवशी चंद्राची छाया। पृथ्वी रक्षण तव कराया।
चंद्रसूर्याची बाळावर छाया ।।जो० ।।४ ।।
पांचव्या दिवशी पांचवा रंग। लावूनि मृदंग आणि सारंग।
संत तुकाराम गाती अभंग ।।जो० ।।५ ।।
सहाव्या दिवशी सहावा विलास। बिलवर हंड्या महाली रहिवास।
संत नाचती गल्लोगल्लीत ।।जो० ।।६ ।।
सातव्या दिवशी सात बहिणी। एकमेकींचा हात धरूनी।
विनंती करिती हात जोडुनी ।।जो० ।।७ ।।
आठव्या दिवशी आठवा रंग। गोप गौळणी झाल्या दंग।
वाजवी मुरली उडविसी रंग ।।जो० ।।८ ।।
नवव्या दिवशी घंटा वाजला। नवखंडातील लोक भेटीला।
युगे अठ्ठाविस उभा राहिला ।।जो० ।।९ ।।
दहाव्या दिवशी दहावीचा थाट। रंगित फरश्या टाकिल्या दाट।
महादारातून काढिती वाट ।।जो० ।।१० ।।
अकराव्या दिवशी आकार केला।
सोन्याचा कळस शोभे शिखराला।
रुक्मिणी बैसली डाव्या बाजूला ।।जो० ।।११ ।।
बाराव्या दिवशी बारावी केली। चंद्रभागेत शोभा ही आली
नामदेव ते बसले पायरीला।
चोखोबा संत महाद्वाराला ।।जो० ।।१२ ।।

## ८. दत्ताचा पाळणा

जो जो जो जो रे जो जो जो। तूं मी ऐसें उमजो ॥ध्रु० ॥
प्रेम पालख दत्तात्रया। हालविते अनसूया ॥
बोधूनि निजरूप समजाया। भवभ्रम हा उडवाया ॥जो० ॥१ ॥
रजोगुणी तू ब्रह्मया। श्रमलासी तान्हया ॥
सुखें निज आतां सखया। धरिं रे स्वरूपीं लया ॥जो० ॥२ ॥
तमोरूपें तूं सदाशिवा। विश्रांति घे देवा ॥
धरिं रे स्वरूपीं तूं भावा। संहारिता विश्वा ॥जो० ॥३ ॥
विष्णु सात्त्विक तूं अहंकार। दैत्यांचा संहार ॥
करितां श्रमलासी अपार। आतां समजे सार ॥जो० ॥४ ॥
ऐसा आनंदें पाळणा। मालो गातसे जाणा ॥
सद्गुरुकृपेनें आपणा। दत्ता निरंजना ॥जो० ॥५ ॥

## ९. दत्ताचा पाळणा

जो जो जो जो रे सुकुमारा। दत्तात्रया अवतारा ॥ध्रु० ॥
कमलासन विष्णु त्रिपुरारी। अत्रिमुनीचे घरीं।
सत्त्व हरूं आले नवरपरी। श्रम दवडीला दुरी ॥जो० ॥
प्रसन्न त्रिमूर्ति होऊनी। पुत्रत्वा पावुनी।
हर्ष झालासे त्रिभुवनीं। राहे ऋषिचे सदनीं ॥जो० ॥
पालख बांधविला सायासीं। निर्गुण ऋषिचे वंशीं ॥
पुत्र जन्मला अविनाशी। अनसूयेचे कुशीं ॥जो० ॥
षट्दश नामासी आधार। दत्तात्रय अवतार ॥
कृष्णदासासी सुख थोर। आनंद होतो फार ॥जो० ॥



## १०. परशुरामाचा पाळणा

जो जो जो जो रे सुखधामा। भक्त पूर्णकामा ॥ध्रु० ॥
क्षत्रिय संहारी रणांगणीं। उग्र स्वभाव करणी।
भारी श्रमलासी खेळणीं। उद्धरितां हे धरणी ॥
धेनद्विजांचे पाळणा। करितां अवतारणा।
तुजला निजवितां पाळणां। दीनावरि करिं करुणा ॥जो० ॥
देव अवतरे हृषीकेशी। भृगूऋषिच्या वंशीं।
संगे घेउनियां विधि-हरिसी। रेणुकेचे कुशीं ॥
सागर सारूनियां वसवीलें। कोंकण-जन पाळिले।
दुष्टाचरणातें दवडीलें। यश हें प्रसिद्ध केलें ॥जो० ॥
स्वस्थानीं जावें भार्गवा। अखंडित चिरंजीवा।
योगमाया ते करि सेवा। परशुरामदेवा ॥
हालवी रेणुका पाळणा। गाई त्या सगुणा।
सखया रामाच्या आभरणा। चुकवी जन्ममरणा ॥जो० ॥

## ११. विष्णूचा पाळणा

जो जो जो जो रे व्यापका। सृष्टीच्या पालका।
निज निज निज बा तूं बालका। तान्हुल्या सात्त्विका ॥ध्रु० ॥
धांवसि दासाच्या धांवणिया। म्हणवुनि श्रमली काया।
श्रम सांडुनियां निज ध्येया। हालविते पाळणिया ॥जो जो ॥१ ॥
शीतें व्यापिलें तुज भारी। निजत सागर जठरीं।
आला काळीमा शरीरीं। फणिवर धुधुःकारीं ॥जो जो ॥२ ॥
अद्भुत तव महिमा श्रुतिनिगमा। न कळे तुझी सीमा।
तो तूं स्त्रीकामा घनश्यामा। अंतरीं धरूनी कामा ॥जो जो ॥३ ॥

तुजला कैसी बा लाज नसे। कैसें झालें पिसें।
त्र्यंबक प्रभु विनवी तुज बहुसें। येत असे रे हांसें।।जो जो।।४।।

## १२. शिवाचा पाळणा

जो जो जो जो रे त्रिनयना। निज बा पंचानना।
सृष्टीसंहार तमोगुणा। भोळ्या निर्मळ मना।।ध्रु०।।
सृष्टी संहार तुज तेणें। बहु झालीं जागरणें।
तो भ्रम सांडुनियां त्वां देणें। निजीं निजसुख घेणें।।जो जो।।१।।
भिक्षाटण करितां अवधूता। श्रमलासी बहु फिरतां।
सोडुनि निजकांता त्वां वसता। केला डोंगरमाथा।।जो जो।।२।।
ऐसा बैरागी नि:संगी। होतासी तूं जोगी।
तो तूं स्त्रीलागीं अर्धांगी। घेउनि फिरसी जगीं।।जो जो।।३।।
अहा त्वां कैसें तप केलें। भिल्लीनें भुलवीलें।
बाळपणासी धरियेलें। बायलेच्यानि बोले।।जो जो।।४।।
ऐसा निलाजरा तूं अससी। शंका नाहीं तुजसी।
किती रे सांगावे तुजपाशी। त्र्यंबक प्रभु सुखराशी।।जो जो।।५।।

## १३. जोग्याचा पाळणा

जो जो जो जो रे घनश्यामा। निजबाळा गुणधामा।
जोगी आलासे विश्रामा। स्वामी दाविन तुम्हां।।जो जो।।ध्रु०।।
जोगी दिसतो विचित्र। त्याला तीन नेत्र।
चर्माविगळें नसे वस्त्र। म्हणवी तुझा मित्र।।जो जो।।१।।
आंगीं लावुनियां विभूती। अर्धांगी पार्वती।
वृषभारूढ तो पशुपती। त्रिशूळ डमरू हातीं।।जो जो।।२।।



आणिक एक नवल दयाळा। कंठ दिसतो निळा।
मस्तकी जळ वाहे झुळझुळां। नेत्रीं अग्निज्वाळा।।जो जो।।३।।
योगी आलासे अंगणीं। तुळसीवृंदावनीं।
तुजला देखीलें नयनीं। घालीन लोटांगणीं।।जो जो।।४।।
आळ घेतली न राहे। जोगी दावीं माये।
सर्पभूषणीं तो आहे। परब्रह्म पाहे।।जो जो।।५।।
गोकुळीं जन्मलें निधान। परब्रह्म ते जाण।
तयाचे चरणीं शरण। एकाजनार्दन।।जो जो।।६।।

## १४. बागुलबावा आला

जो जो जो बाळा नको रडूं गोपाळा। दारीं बागुलबावा आला।
बागुलबावाचें रूप दिसे मनोहर। आंगावरी व्याघ्रांबर त्रिशूल।
डमरू शंख शोभे फणिवर। गळ्यामध्यें मनुष्यमुंडांचे हार।
मिशा पिंगट शिरीं जटांचा भार। वरी वाहे झुळझुळ नीर।।
भस्म सर्वांगी दिसतो नीळा।
आरूढोनि नंदीवर आला।।जो०।।१।।
बागुलबावाचा ऐकुनि शब्द कानीं। तेव्हा रडे चक्रपाणी।।
मातेसी म्हणे चल बाहेर घेवोनी। दाखवीं बागुल नयनीं।
नको छंद घेऊं उभा राहें गोपाला। मी भिक्षा वाढितें त्याला।।
म्हणे नंदाला घ्या याला क्षणभरी। मी भिक्षा वाढितें वेगीं।
मोत्यें पोवळ्यांनी सुवर्णताट भरूनी। गेली द्वाराबाहेरी घेउनी।।२।।
घ्या घ्या बायांनी नका करूं उशीर। माझें बाळ भितरें फार।
नव्या नवसांनी एवढाचि पुत्र आम्हांला। तो मोठ्या दैवें लाभला।।

बाळ आहे कसें आहे सर्वां माहीत। दिसे जगावरी नाईक।
मी बाळाचा शब्द ऐकुनि कानीं। त्वरें आलों मी धांवोनी।
पहावें बाळाला इच्छा माझे मनीं। त्वरें आलों मी धांवोनी।
अहा नारायणा हरिसेवेमधीं गुंतला।
मी अनंत नमितों त्याला।।जो।।३।।

## १५. दशावतारांचा पाळणा

जो जो जो जो रे मधुसूदना। बाळा जगजीवना।
हालवी यशोदा पाळणा। निज नारायणा।। ध्रु०।।
प्रथम अवतारीं क्षीराब्धी। स्तवन करितां विधी।
करुणा परिसूनी गुणनिधी। शंखासुरासि वधी।।जो०।।
द्वितीय संकटीं इंद्रासी। कूर्मरूप तूं होसी।
सिंधू मंथुनियां श्रमलासी। सौख्य सकळा देसी।।जो०।।
तिसरा वराह हिरण्याक्षी। धरणी घालुनि कुक्षी।।
पळतां धरियेला अनुलक्षी। फोडुनि त्याच्या कुक्षीं।।जो०।।
चतुर्थ नरसिंह विशाळ। अग्नीचा कल्लोळ।।
निवटुनि असुरासी समूळ। काढी अंतरमाळ।।जो०।।
पंचम वामन सुंदर। खुजट द्विजवर।
तेजें भुलवीला दिनकर। धरिला दानासुर।।जो०।।
षड्रिपु भार्गव विंदानीं। पितो तो जमदग्नी।
पृथ्वी निःक्षत्री तिहिं बाणीं। दिधली विप्रां दानीं।।जो०।।
सप्तम अयोध्यापुरवासी। राजा राम होसी।
पितृवचनातें पाळीसी। राहुनियां वनवासी।।जो०।।



अष्टम अवतारीं गोकुळीं। झालासी वनमाळी।
चाणुरकंसादि मंडळी। निवटुनि केली होळी।।जो०।।
पूतना कपटार्थी कुटमंत्री। शोधुनि पाहे धरित्री।
प्रचंड मेघांत दशसूत्री। लक्षुनि धरिली धात्री।।जो०।।
बौद्ध कलंकी होणार। पुढील युगांतर।
करूं नये अव्हेर दातार। दासा चरणीं थोर।।जो०।।

## १६. अक्रूराचा पाळणा

अजि अक्रूर हा नेतो श्रीकृष्णाला। सखे काळ कोठुनि आला।।
नाही सुचत मसीं काम धाम आणि धंदा। आठवतें आनंदकंदा।।
मुळापासुनि मी होतें प्रभुचे छंदा। नाहि दया आली गोविंदा।।
सांवळी मूर्ति आजि पाहूं
युक्तिनें बहुत समजावूं
उत्तम गुण हरिचे गाऊं
नसे धीर मला जीव व्याकुळ झाला। सखे काळ कोठुनि आला।।
या कृष्णानें लाविली ममता लटकी। बाई कपटी पुरता चटकी।।
वश कुब्जेला झाला नागर लटकी। आतां हरी तिला लंपट कीं।।
सखे पुण्यभाग आजि सरला
मुरलीधर प्रभु अंतरला
सर्वस्वें उपाय हरला
जसें निष्फळ हें रत्नजडित अंधाला। सखे काळ कोठुनि आला।।
प्रभुंचे रूप पहा जशि मदनाची मूर्ति। सच्चिद्घन अगम्य कीर्ती।।
मुखचंद्राची काय वर्णु सुखपूर्ती। दर्शनें कामना पुरती।।
दुष्ट दैत्यांचे हात पहा खुरखुरती। नलगे तिला तुर्तातुरती।।

धन्य धन्य यशोदाबाई
तव सुत पहा शेषशाई
कुंजवनीं चारितो गाई
परब्रह्म गडे रूप दिसे आम्हांला। सखे काळ कोठुनि आला॥

## १७. शिवरायाचा पाळणा

गुणी बाळ असा जागसि कां रे वायां। नीज रे नीज शिवराया॥
अपरात्रीचा प्रहर लोटला बाई। तरि डोळा लागत नाहीं॥
हा चालतसे चाळा एकच असला। तिळ उसंत नाहीं जीवाला॥
निजवायाचा हरला सर्व उपाय। जागाच तरी शिवराय॥
चालेल जागता चटका
हा असाच घटका घटका
कुरवाळा किंवा हटका
कां कष्टावसी तुझी सांवळी काया। नीज रे नीज शिवराया॥१॥

ही शांत निजे बारा मावळ थेट। शिवनेरी जुन्नर पेठ॥
त्या निजल्या ना तशाच घाटाखालीं। कोंकणच्या चवदा ताली॥
ये भिववाया बागुल तो बघ बाळा। किती बाई काळा काळा॥
इकडे हा सिद्दि-जवान
तो तिकडे अफझुलखान
पलिकडे मुलुख मैदान
हे आले रे तुजला बाळ धराया। नीज रे नीज शिवराया॥२॥



## १८. श्री शिवरायांचा पाळणा

मी लोटीतें झोंका तुज शिवबाळा। सुंदरा, नीज स्नेहाळा॥ध्रु०॥
तनुशांतीतें शांत नीज तुज येण्या। राष्ट्रगीत गीतें तान्ह्या।
बघ दास्यिं जळ मही अंबिका माय। हंबरडे फोडी हाय॥
निजशत्रूंनीं हिचें भंगिलें छत्र। मांगल्य-सूत्र स्वातंत्र्य॥
या दुःखानें दुःखी फार रे पाही। मी जीजाबाई तव आई॥
बहु शत्रु मातले मेले। रे
मेल्यांनी आर्यधन नेलें। रे
आमचें राज्य बुडवीलें। रे
कुणि निपजेना शास्ता या चांडाळा। सुंदरा नीज स्नेहाळा॥१॥
भूमातेच्या भूतकाळिं उद्धरणीं। झुंजली रणीं मृडरमणी॥
श्रीरामानें रावण वधिला लढुनी। वानरां वीर बनवूनी॥
घे स्वतंत्रता कंसाच्यापासूनी। गोविंद गोप जमवूनी॥
तूं तसा वीर होशिल का। रे
तरवार करीं धरशिल का। रे
मिळविशिल मावळे गडि का। रे
रणिं वधावया देशशत्रुंचा मेळा। सुंदरा नीज स्नेहाळा॥२॥
भूभक्तिचें प्रबल दुग्ध पाजीन। मी वीर तुला बनवीन॥
रिपुरक्तें भू तुझ्या करीं न्हाणीन। स्वातंत्र्य घरीं आणीन॥
साधीन सख्या जाण लोककल्याण। तुज राज्यपदीं स्थापून॥
स्वातंत्र्य-वीराची माता। रे
मी स्वतंत्र सुधन्य होतां। रे
ध्वज स्वातंत्र्याचा डुलतां। रे
ठेवीन तनू अशा आनंदमय वेळां। सुंदरा नीज स्नेहाळा॥३॥

## १९. निर्गुणाचा पाळणा

सुतार निर्गुणिचे तुजसाठीं आणवीले। पाळणे रंगित बनवीलें॥
चहुं बाजूंना चिमण्या मोर बसवीले। पाळण्यांत बाळ निजविले॥
निज निज बाळा रे झोके देता हात दुखला।
गाणे गाता कंठ हा सुकला॥
जाई जुई चमेली पुष्पांनी पाळणा गुंफिला।
न जाणों खडा बाळाला रुतला॥१॥
केव्हांची मी हालवितें न सुचे कामधाम आणि धंदा।
नीज रे बाळा गोविंदा॥
रडे एकचि हा हरि मोठा बाजिंदा। कोणी घ्या मनमोहन मुकुंदा॥
काय सांगू सखे झालें बाळ मसि यंदां।
घेत अलाबला या तीनदां घ्या घ्या॥
बायांनो पाळण्यांत हरि मुतला।
न जाणों खडा बाळाला रुतला॥२॥
कोणे पापिणीची दृष्ट लागली ग बाई।
बाळ अगदिच स्तन घेत नाहीं॥
काय सांगू सखे उपाय करूं तरी काई।
नेत्र झांकले उघडित नाहीं॥
जिव झुरतो हा दुःखी बाळाचे पायीं। कोठेंचि मन लागत नाहीं॥
कोणे सवतीनें भरला भिलावा उतला।
न जाणों खडा बाळाला रुतला॥३॥
रूप बाळाचें काय सांगू तुजपाशी। जसे भानु आले उदयासी॥
अहा रे भगवंता घडलें काय अशा पुतळ्यासी।
तुझी कळा न कळे कोणासी॥



जीव ध्यातो रे ध्यातो सदा तुजपाशीं। चला वेगें वैकुंठासी॥
मनिं गडबडला जीव सेवेमधीं गुंतला।
न जाणों खडा बाळाला रुतला॥४॥

## २०. पाळणा श्री शाहूचा

सन अठराशें सत्याण्णव सालांत। आनंद झाला करवीर शहरांत॥
पहिल्या शुक्रवारीं श्रावण महिन्यांत।
पुत्र जाहला शाहुराजासी विश्रांत॥
चंद्र उगवला लक्ष्मी महालांत॥ जो बाळा जो॥१॥
शाहुराजाची पुण्याई थोर। गुढ्या उभ्या शहरांत तोफेचा मार॥
झाला आनंद होतो गजर॥ पानसुपारी वांटिती साखर॥
झडे चौघडा अंबेचे पुढें।।जो०॥२॥
राणी सरकार प्रसूत झाली। घड्याळ नवबंदी झडूं लागली॥
शाहुराजासी वरदी कळली। पूर्व पुण्याई ईश्वरें केली॥
ऐसें शंकराला पार्वती बोलली।।जो०॥३॥
शाहुच्या गादीला चढलें भूषण। आनंद झाला पुत्र पाहून॥
मानपानकरणी आल्या धांवून। करिती सत्कार बाळावरून॥
वांटिती विडे मानाप्रमाणें।।जो०॥४॥
बिजलीच्या बत्तीचा प्रकाश भारी। लाह्या टाकिल्या राजमंदिरीं॥
पाहून तृप्त झाल्या नगरींच्या नारी।
आणुनि ओतिती पाण्याच्या घागरी॥
खण-नारळांनी ओट्या सांवरती।।जो०॥५॥
दोन्ही हिरकण्यांवरती जन्मला हिरा॥
मोठमोठ्या शहरीं पाठविल्या तारा॥

बंदी कैद्यांमध्यें फोडल्या मोहरा। जागोजागीं निशाणें तोरणें भरारा॥
पहिल्या दिवसाचा मजकुर सारा।।जो०॥६।
दुसरे दिवशीं दुसरा प्रकार। हत्तीवरोनि वांटिती साखर॥
घोडे कोतवाल जिलेबी पूड। घणघण बाज्या होतो सुंदर॥
घरोघरीं वाटी भरूनि साखर।।जो०॥७॥
तिसरे दिवशीं त्रिभुवन मूर्ति। दत्ताची छाया बालकावरती॥
आपल्या नांवानें पाषाण करिती।
करूनि पूजा ओंवाळी आरती।।जो०॥८॥
चवथे दिवशीं चंद्र पूजेचा। गजाननमहाराज साह्यक बाळाचा॥
खेळ खेळतो कृष्ण गोकुळींचा।
प्रकाश पडला महालिं सूर्याचा।।जो०॥९॥
पांचवे दिवशीं सटवीचा मान। तिला आज्ञा दिली परमेश्वरानें।
लिहिते अक्षर आपल्या हातानें। कुवारणी पूजुनि झाला सन्मान॥
हळदकुंकू घेउनि नागरणी जाण।।जो०॥१०॥
सहावे दिवशीं सहावा उल्हास। सडासारवण केलें वाड्यास॥
तेलें सुवासिक लावी अंगास।
पाणी घालिती तान्ह्या बाळास।।जो०॥११॥
सातवे दिवशीं साती आसरा। गुप्त रीतीचा घालिती फेरा॥
लिंबू, नारळ टाका उतारा। पाणी घालिती सखया सुंदरा॥
दृष्ट काढूनि लाविती अंगारा।।जो०॥१२॥
आठवे दिवशीं आठवा आनंद। पोटीं जन्मला कृष्ण गोविंद॥
हार पुष्पांचा सुटतो सुगंध।।जो०॥१३॥
नवव्या दिवशीं नवस केला। खेळणें पाळणें वाहिन तुला॥
कृष्णपालख लाभू दे मला।।जो०॥१४॥



दहावें दिवशीं दहावा उल्हास।
हांडी झुंबर महालीं करूनि आरास॥
तेल सुवासिक अंगास।
पाणी घालिती तान्ह्या बाळास।।जो०॥१५॥
अकरावें दिवशी अकरा लिंगें। दास नामाचा उभा बजरंग॥
पांची हत्यारें प्रभुच्या संगे।।जो०॥१६॥
बारावें दिवशीं केलें बारशाला।
सोन्याचा पाळणा मोत्यांनी गुंफिला॥
आंगडे टोपडें किनखापी त्याला। हिरेजडित कोंदण पिंपळपानाला॥
शाहूच्या गादीला प्रभू निपजला।
राजाराम नांव ठेविलें जाहीर सर्वांला ॥ जो बाळा जो।।१७॥

## २१. लवांकुशाचा पाळणा

मी हिंडवितें गाउनियां लडिवाळा। पाळणा लवांकुश बाळा
मी वासंती आळवितें अंगाई। छकुल्यांनो तुमची आई
लुकलुकती चिमणे डोळे
जिभली ही चुट चुट बोले
वर उचलाया बाळ मुक्यांची जोडी। लावितसे लाडी गोडी
किती दिवस अशी चाटणार हीं बोटें। व्हा गडे लवकर मोठे
मग जाऊं या आपण सारीं मिळुनि। बघण्यास अयोध्या भुवनीं
अळी मिळी गुपचिळी बरं का
सांगाल कुणाला जर का
कुस्करीन गाल हे बरं का
अन् इवलाले ओंठ असे झांकूनी। ठेवीन मुके घेऊनी॥

## २२. वनदेवीचा पाळणा

बाळा जो जो रे ऽ ऽ ऽ
पापणिच्या पंखांत झोंपुं दे डोळ्यांचीं पांखरें!
झोंपी गेल्या चिमण्या राघू
चिमण्या राजा नकोस जागूं
हिरव्या पानांवरी झोंपली वेलींचीं लेंकरें!
पुरे खेळणें आतां बाळा
थांबव चाळा, थांबव बाळा
शब्द ऐकतें झोंपेमधुनी चाळवतें बा रें!
मेघ पांढरे उशास घेउनी
चंद्र तारका निजल्या गगनीं
वनदेवींनीं उघडीं केलीं स्वप्नांचीं मंदिरें!
बाळा जो जो रे ऽ ऽ ऽ

## २३. रजनीमाईचा पाळणा

बाळा जो जो अंगाई। गाई रजनी माई।।ध्रु०।।
निजलीं सारीं रानपाखरें
गाती निर्झर, गाती वारे
गाती दिशाही दाही, बाळा जो जो अंगाई।।१।।
आकाशामधीं शब्दावांचुनि
यक्ष यक्षिणी गाति गाणीं
लहर तरंगत येई, बाळा जो जो अंगाई।।२।।



सुबक रुपेरी तुझा पाळणा
नक्षत्रांच्या राघू मैना
छतास जडल्या पाही, बाळा जो जो अंगाई।।३।।
हंसरा राजस माझा राणा
कुणा दिसेना कधिं रडतांना
दृष्ट न होवो बाई, बाळा जो जो अंगाई।।४।।

## २४. आजीबाईचा जुना पाळणा

(वृत्त : अभंग)

पाळणा बांधीला, रंगीत सुंदर। तान्हा सुकुमार, माउलीचा।।
पालख पाळणा, मोत्यांनीं विणीला।
मामानें धाडीला, तान्हे बाळा।।
रंगीत पाळणा, त्याला रेशमाची दोरी। हालवीते गोरी, इंदुताई।।
पाळण्याच्यावरी, खेळणें कागदाचें।
गोड बोलणें बाळाचें राजसाचें।।
पाळण्याचे दोर, जसे मोतियाचे सर। शोभिवंत घर, पाळण्यानें।।
आंथरूण केलें, पांघरूण शेला। निजवीलें तुज, मधुबाळा।।
आंथरूण केलें, मऊ ऊबदार। झोंप चारी प्रहर, तान्हे बाळा।।
सकाळच्या वेळीं, किती असे कामधंदा।
नको रडूं तूं गोविंदा, तान्हे बाळा।।
पहाटेंची वेळ, दूर कोंबडा आरवे।
तान्हुल्या झोंपीं जावें, लहान तूं।।
पहाटेंची वेळ, नीज रे बाळपणीं। ऊठ तूं मोठेपणीं, तान्हे बाळा।।
नीज रे बाळका, आपुल्या पालखीं। तुला रक्षण जानकी-रघुनाथ।।

## २५. बाळाचा पाळणा

लगबग नीज वेल्हाळा! लडिवाळा बाळा!
अजुनि तुझा वाजत का रुणुझुणु हा वाळा?
तान्हुल्या सानुल्या! राजसा पांखरा!
किती रे असा खेळशील? नीज ना वांसरा!
चंद्र, चांदण्या, कळ्याही झोंपल्या!
पेंगुळली दुनिया!
चिमण्या मोरा! जोजवूं किती तुला!
नीज नीज रे वेल्हाळा!

## २६. अंगाई-गीत

बाळा कां झोंप येईना?
कां चैन पडेना?
भूमि ही रुतलि राजसा या। माझा॥
माता देई अंकि शय्या। बाळा।
घाली पांघरूण माया। वेल्हाळा।
करि प्रेमळ गाना॥ आई॥

## २७. बाळराजाचा पाळणा

बाळा जो जो रे। झोप घेई आता! माझ्या सोनुल्या।
गोष्टी मी साऱ्या। कथिल्या तुला, जो० ॥१॥
झोपला राघू। झोपली मैना। झोप घेई रे।
माझ्या नंदना जो० ॥२॥



झोपले इवले। पानांचे बाळ। नको वाजवू।
तुझा हा चाळ, जो० ॥३॥
वारा गातो बघ। तुजला अंगाई। म्हणतो हळूच।
करी गाई गाई, जो० ॥४॥
इवलासा हत्ती। झोपला कसा। आणिक डोळे।
मिटतो ससा, जो० ॥५॥
खेळणी तुझी। सारी झोपली।
निद्रेच्या राज्यां। दंग जाहली, जो० ॥६॥
चांदोमामा बघ। वर झोपला।
स्वप्न पाळणा हळू हलला, जो० ॥७॥
कितीक पऱ्या। नेतील तुला।
दावतील त्या सुख सोहळा, जो० ॥८॥
गातिल आणि सुरेख गाणी। बाळ हा माझा।
घेई ऐकूनी, जो० ॥९॥
झोपली धरणी। निळे आकाश।
माझ्या सोनुल्या। निज तू शांत, जो० ॥१०॥
झोपला बाळ। मिटे पापणी। ठेव सुखी देवा।
हीच विनवणी, जो० ॥११॥

※ ※ ※

# स्त्री गीते

## १. घाण्याचे गाणे

देव गजाननाला आठवूनि। घाणा भरू या चला साजणी।
हो ग चला साजणी।।ध्रु०।।

ऋद्धिसिद्धिला आळवू चला। हस्त लागू द्या आपुला भला।
ग आपुला भला।।

धनधान्याची ना पडो तूट। लावू कार्यासि मन एकजूट।
उभा देवाजी मम अंगणी। घाणा भरू या चला साजणी।
ग चला साजणी।।१।।

आणा सुवासिनी हंसमुखी। कुणी बोलवा सुभगा सखी।
ग सुभगा सखी।।

हातगुणाच्या बोलवा सया। पुत्रवतीची असू द्या छाया।
ग असू द्या छाया।।

कुलदैवत आठवा मनीं। हो आठवा मनीं।
शुभ आशीर्वचा घेऊनी। हो घेऊनी।
वर-वधु बैसली शुभलक्षणी। हो शुभलक्षणी।
घाणा भरू या चला साजणी। हो चला साजणी।।२।।
आता कांडण कांडू या चला। पूजा जातिया आणि मुसळा।
ग आणि मुसळा।।
वरमाईची भरवा ओटी। लावा अक्षत शुभ लल्लाटी।
ग शुभ लल्लाटी।।



आप्तइष्टांचा जमवा मेळ। आता लावा ग हळदी तेल।
हास्य विनोद करूनि जनीं। घाणा भरू या चला साजणी।।३।।
रामरायाचा करा आठव। स्मरा स्मरा ग रमामाधव।
ग रमामाधव।।
सीतामाईला करा आमंत्रण। सवे आणावे हनुमंताना।
ग हनुमंताना।।
शुभ करे द्या मांडवा मेढ। करा पुण्याईची लागवड।
ईश देईल फल बहुगुणी। घाणा भरू या चला साजणी।
ग चला साजणी।।४।।

## २. घरगुती घाण्याचे गाणे

घाणा भरियला घाणा भरियला। सव्वाखंडी सुपारी।
सव्वाखंडी सुपारी। मांडव व्यापारी गणराज।।१।।
आधी मूळ धाडा। घुंगुराची गाडी।
मानाची वऱ्हाडी। अंबाबाई।।२।।
आधी मूळ धाडा, आधी मूळ धाडा। चिपळूण गावा।
चिपळूण गावा। परशुरामे देवा आमंत्रणा।।३।।
मांडवाच्या दारी, मांडवाच्या दारी। ओल्या हळदीचे वाळवण।
ओल्या हळदीचे वाळवण। नवऱ्या मुलीला केळवण।।४।।
मांडवाच्या दारी, मांडवाच्या दारी। चिखल का ग झाला।
नवऱ्या मुलीचा बाप न्हाला। बाप न्हाला।।५।।
घाणा भरिला घाणा भरिला।। सव्वाखंडी भाताचा।
सव्वाखंडी भाताचा। नवरा मुलगा गोताचा।।६।।

मांडवाच्या मेढी, मांडवाच्या मेढी। दूरच्या दूर सारा।
लोडतक्याला जागा करा। जागा करा॥७॥
घाणा भरिला, घाणा भरिला। सव्वाखंडी वरती।
सव्वाखंडी वरती। वरमाई मिरवती। मिरवती वरमाई॥८॥

## ३. विहीण

दिधली तुम्हाला बाला। तुम्ही प्रेमभरे सांभाळा।
लहानाची मोठी करूनि। तू जाता दुसऱ्या सदनी।
परि भरून ये मम डोळा॥१॥
जरी केले कन्यादान। तू जाशी पति कर धरून।
परि वाटे दुःख जीवाला॥२॥
बंधूसम दीरभाई। भगिनीसम नन्सबाई।
मामंजी पित्यासम तुला॥३॥
जननीसम सासुबाई। आज्ञेत त्यांच्या राही।
भूषण असे माहेराला॥४॥
कन्येसम स्नुषा माना। प्रेमाने कामे सांगा।
लक्ष्मी असे तुम्हाला॥५॥
जा सासरी आता बाई। संसारी सुखी तू राही।
सुखवी पती मग तुला॥६॥

## ४. नाच ग घुमा

'नाच ग घुमा' 'नाचू मी कशी?'
'सासू मारीते' 'बरं करीते,'



'नाच ग घुमा' 'नाचू मी कशी?'
'सासरा शिव्या देतो' बरं करीतो,'
'नाच ग घुमा' 'नाचू मी कशी?'
'दीर चुगली करीतो' 'बरं करीतो,'
'नाच ग घुमा' 'नाचू मी कशी?'

## ५. विहीण (मुलगी सासरी जाताना)

बाळगली घालुनि आजवर पाखर मायेची
लेक ही ठेवच परक्याची॥ध्रु०॥
तळहाताच्या फोडासम तिज आजवरी जपली।
कर्तव्याची जाणीव होता दूर तिला केली।
काळिज माझे तिळतिळ तुटते, काळजी घ्या हो तिची॥१॥
कन्या आमुची देते तुम्हा होत किती यातना
आइच्या हृदयाची तुम्हा असेल हो कल्पना।
पाडस माझे दूर चालले, वेळच ही अशी॥२॥
हाव नसे हा दागदागिने शालु-शेल्याची।
असे मात्र ही पोर भुकेली मायेच्या शब्दांची।
तुम्हीच आता आई तिजला, लेकच ही तुमची॥३॥
एकच होती ती मी तुम्हा अर्पण ही केली।
चुकले मुकले पदरी घाला आगळीक जर झाली।
प्रेमाने हो तुम्हीच शिकवा रीत तुम्हा घरची॥४॥

## ६. डोहाळे झोपाळ्यावरचे

डोहाळे तव पुरवी भगिनी, काय आवडे सांगावे मनी
गजानना आधी नमुनि, ओटी भरली पाच फळांनी
डोहाळे तव पुरवी भगिनी।।१।।
झोपाळ्यावरी बसवूनि तिजला, केशर लावूनि दो हस्ताला
चोळी हिरवी, शालू नेसवुनि, पुरवी भगिनी।।२।।
चांद पाहुनि पौर्णिमेचा, गजरा घालुनि जाईजुईचा
मांडे घेऊनि बसल्या भोजनी, पुरवी भगिनी।।३।।
भगिनीसुत दीर्घायु होवो, पूर्वजांची तव कीर्ती वाढवो
हीच विनंती प्रभुच्या चरणी, पुरवी भगिनी।।४।।

## ७. डोहाळे - १

होतसे काय गे तुजला, पुसतसे जननी दुहितेला
म्लना हे मुख तव झाले, डोळे बघ खोल किती गेले
गालावर लाली नाही, पांढरे ओठ किती बाई।
निशीदिनी का निजू निजू करिशी, भोजनास का नच उठसी
समजू तरी काही, समजू तरी काही, जीव माझा भिऊनि जाई।
जडपणा अंगी संचरला, आळस हा अतिशय आला
समजली माऊली तिची, गर्भाची चिन्हे दिसती
नातू होणार नातू होणार, हर्षा नच पारावार
द्राक्षे ही सुंदर आणिली, आंब्याने परडी भरली
यातील रुचत न बाळे, खा तर मग पेरू-केळे
लाग खायाला, लाग खायाला, डाळिंब आणायाला गेला।



यातील रुचत ना काही, चिवडा तरी करिते बाई
भजी केली घोसाळ्याची, कोशिंबीर तशी कांद्याची
वांगीभात ऊन ऊन केला, बासुंदी पुरी जोडीला
वाटी चांदीची, वाटी चांदीची, भरली बघ श्रीखंडाची।
नऊ महिने होती डोहाळे, परोपरीचे करिती सोहाळे
नऊ दिवस वरती जाता, पुत्ररत्न प्रसवे दुहिता
माय बापाला, माय बापाला, आनंद गणगोताला।

## ८. डोहाळे - २

सखे काय होती मनी भावना, तुला काय सुखवे ते बोल।।ध्रु०।।
श्रीशारदेच्या मनी मानसी, क्रीडा करावयासी का वांछिसी
रुचे काय वेणु सुधा सेवना, सखे काय होती मनी भावना।।१।।
नभातुन त्या तारका सुंदरी, तुला पाहुनि तोषल्या अंतरी
हसे जैशी कौतुके ती पौर्णिमा, सखे काय...।।२।।
बागेमध्ये रातराणी फुले, निशिगंध, चाफा, चमेली डुले
मधुगंध मोही तयांचा मना, सखे काय...।।३।।
ज्योत्स्नेमध्ये या तू मोती दिसे, सृष्टिवरी शांतता नांदते
अशा शांत वेळी गडे बोलेना, सखे काय...।।४।।
वैभवासी नेई ही हिंद भू, अशा सुपुत्राची दे देवाप्रभू
प्रभुच्या पदी एक प्रार्थना, सखे काय...।।५।।

# ९. मातृभोजन


हा मातृभोजनी पहा सयांनो बाळ गडे बैसला
वाजतात वाद्ये किती। चौघडे सनई गर्जती। बैसल्या भव्य पंगती। जनांच्या मोद मना जाहला। हा मातृ० ॥१॥
रंगवल्ली चित्तहारी। काढूनि तियेचे वरी। रंग तेही नानापरी सर्व या दीपावली लाविल्या। हा मातृ० ॥२॥
पात्र ते चांदीचे पुढे। सौवर्ण वाटिका कडे। नवरस पक्वान्ने मिळे। दक्षिणा विप्रांकरी अर्पिल्या। हा मातृ० ॥३॥
बैसूनि माय संमुखी। घास देई पुत्रमुखी। या माय लेकरा सुखी। करो ती माता जगन्माता। हा मातृ० ॥४॥

* * *

For Hariom Astrologers

Proprietor

## धार्मिक प्रकाशन संस्थेची
### लोकप्रिय प्रकाशने




**संपूर्ण चातुर्मास**
संपादक : का.अ.जोशी

**संपूर्ण सुलभ ज्ञानेश्वरी**
संपादक : का.अ.जोशी

**श्री एकनाथी भागवत कथासार**
एकनाथी भागवताचा सुगम सारांश

**श्रीभावार्थ रामायण कथासार**
(श्रीसंत एकनाथ महाराजकृत)

**सार्थ श्रीज्ञानेश्वरी** किंमत रु. १६०/-
संपादक : का. अ. जोशी

**श्री गुरुचरित्र** साधी बांधणी
सरस्वती गंगाधर कृत

**श्री नवनाथ भक्तिसार**
(धुंडिसुत श्री. मालुकवि विरचित)

**श्री भक्तविजय पोथी**
श्री महिपती विरचित

**श्री हरिविजय पोथी**
पंडितकवि श्रीधर विरचित

**श्री नासिकेत पोथी**

**श्री देवी माहात्म्य** रामबाबा वर्णेकर

**श्री मल्हारी माहात्म्य पोथी**
डेमी साईज

**श्री नवनाथ कथासार**
जितेंद्र ठाकूर

**श्री हरिविजय कथासार**

**श्री भक्तविजय कथासार**

**श्रीशिवलीलामृत कथासारासहित**

धार्मिक प्रकाशन संस्था, मुंबई

Astro • Puja • Vastu

# FALIT JYOTISH AND VASTU SHASTRA CONSULTANT

## FOR ALL DHARMIK POOJA'S

SHRI GANESH PUJA

SHRI SATYANARAYAN PUJA

VASTU SHANTI

WEDDING | SAKHARPUDA | MUNJ

JANANA SHANTI | RUDRABHISHEK

SAPTASHATI PATH | HAVAN | ETC.

## HARI OM DHARMIK PUJA VIDHI KENDRA

**SANPADA OFFICE**
Office No. 8, 1st Floor, Shiva Triveni Galleria CHS., Plot No. 13, Sector 8, Sanpada, Navi Mumbai - 400705.

**GOVANDI OFFICE**
Shri Swaybhu Hanuman Mandir, Deonar Mahanagarpalika Vasahat, Govandi, Mumbai - 400043.

hariom astrologers
hariom astrologers
hariom_astrologers
hariomastrologers@gmail.com
www.hariomastrologers.com